## विशेष दिवाणी दावा क्र. ११/२०२१ मधील नि.क्र. ५ खालील आदेश

दावा व अर्जातील कथनांचे अवलोकन केले. विद्यावंत वकील श्री. आर. एस. तोडकर यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत दावा हा वाटपाकरिता व कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. सकृतदर्शनी असे दिसून येते की दावा जमिनीमध्ये वादीचे हक्क व हितसंबंध आहेत. वादीचे असे म्हणणे आहे की प्रतिवादी क्र. १ व २ हे दावा मिळकतीतून वादीला हुसकावून लावत आहेत व वादीचा हिस्सा डावलत आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १ हे दावा मिळकत तबदील करण्याचा प्रयत्न करत आहेत. वादीची कथने व कागदपत्रे विचारात घेता मी या अनुमानास येते की सकृतदर्शनी प्रतिवादी क्र. १ व २ हे दावा मिळकतीतील वादीचे वहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत हे वादीने सकृतदर्शनी सिध्द केले आहे. जर एकतर्फा आदेश केला नाही तर प्रतिवादी क्र. १ व २ हे दावा मिळकतीतून वादीला हुसकावून लावून वादीचा हिस्सा डावलू शकतात व त्यामुळे वादीचे पैशाने न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी ही तुर्तातुर्त एकतर्फा मनाई आदेश मिळणेस पात्र आहे या अनुमानास मी येते. म्हणून खालीलप्रमाणे आदेश करते -

### आदेश

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अगर अडथळा करू नये, तिला दावा मिळकतीमधून हुसकावून लावू नये अगर दावा मिळकत कोणास विक्री, तबदील अगर त्यावर बोजे निर्माण करू नयेत असा प्रतिवादी क्र. १ व २ चे विरूध्द पुढील तारखेपर्यंत एकतर्फा तुर्तातुर्त मनाई आदेश देणेत आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
Yamini Dilip Boravke
Date: 2021.03.22
15:09:00 +0530

दिनांक – २०.०३.२०२१

(यामिनी बोरावके)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गडहिंग्लज